**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक १७ मार्च २०२६**

**ठळक बातम्या**

1. **महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या सुधारणा विधेयक २०२६ विधानसभेत एकमताने मंजूर.**
2. **राज्य सरकारद्वारा रबी हंगामाच्या ई-पीक पाहणीसाठी ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ.**
3. **एलपीजी पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी राज्य स्तरावर नियंत्रण कक्ष सुरू केल्याची मंत्री छगन भुजबळ यांची माहिती.**
4. **उद्या चंद्रपूर जिल्ह्यात मेघ गर्जनेसह पावसाचा इशारा, ऑरेंज अलर्ट जारी.**

-----------------------------------------------

जिल्हा परिषद विधेयक मंजूर

महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या सुधारणा विधेयक २०२६ आज विधानसभेत एकमताने मंजूर झालं. यानुसार जिल्हा परिषदेत एकूण सदस्य संख्येच्या दहा टक्के किंवा पाच सदस्यांना नामनिर्देशित करण्याची तसच पंचायत समित्या मध्ये एकूण सदस्य संख्येच्या वीस टक्के किंवा एका सदस्याला नामनिर्देशित करण्याची तरतूद करण्यात आली आहे. ग्रामविकासासाठी काम करणारे सामाजिक कार्यकर्ते, तज्ञ यांना जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यामध्ये प्रतिनिधित्व मिळावं हा याचा हेतू असल्याचं सरकारने सांगितलं. अशा व्यक्तींच्या अनुभवाचा आणि ज्ञानाचा उपयोग करणं हे याचं उद्दिष्ट आहे. या सदस्यांना मताधिकार नसेल असं मंत्री जयकुमार गोरे यांनी स्पष्ट केलं.

-----------------------------------------------

विधी मंडळ

राज्य सरकारनं रबी हंगामासाठी ई-पीक पाहणीसाठीची मुदत ३१ मार्चपर्यंत वाढवून दिली आहे. आतापर्यंत केवळ ५५ टक्के क्षेत्राची पाहणी पूर्ण झाल्यानं सरकारनं हा निर्णय घेतला आहे. पीक नोंदणीच्या अभावी नैसर्गिक आपत्ती, पीक वीमा, पीक कर्ज यासारख्या लाभापासून शेतकरी वंचित राहू नये म्हणून हा निर्णय घेतल्याचं निवेदन

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत आज दिलं.ऐकुया आजच्या विधिमंडळ कामकाजाचा आढावा आमच्या प्रतिनिधींकडून -

*(व्हॉइस कास्ट - नम्रता)*

*महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ सुधारणा विधेयक आज विधानसभेत एकमताने मंजूर झालं. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तसंच विद्यापीठाचं प्रशासन, संरचना यांचं बळकटीकरण करणं आणि उच्च शिक्षण आणि संशोधनाचा दर्जा सुधारणं हे याचं उद्दिष्ट असल्याचं सरकारने सांगितलं. केंद्र सरकारने विहित केलेल्या आणि राज्य सरकारने स्वीकारलेल्या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी विद्यापीठाला आवश्यक उपाययोजना करण्याची तरतूद यात आहे. कुलगुरूंच्या शिफारशीवरून प्र-कुलगुरुला पदावरून हटवणं, अधिष्ठात्याचं पद रिक्त झालं तर सहा महिन्यांच्या कालावधीसाठी नियुक्ती करणं आदी तरतुदींचा यात समावेश आहे. महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक, २०२६ आज गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी विधानपरिषदेत मांडलं. सध्या या विधेयकावर सभागृहात चर्चा सुरू आहे. जबरदस्तीनं धर्मांतराला आमचा विरोध आहे. मात्र विविध ठिकाणी काम करणाऱ्या धार्मिक संस्था, मोफत शिक्षण देणाऱ्या संस्थांनाही हा कायदा लागू होणार का, हे स्पष्ट होणं गरजेचं असल्याचं मत शशिकांत शिंदे यांनी यावरच्या चर्चेत व्यक्त केलं. काल विधानसभेत हे विधेयक मंजूर झालं आहे. (आकाशवाणीसाठी वृत्तविभागातून मी नम्रता फलके)*

---

विधिमंडळ / एलपीजी

एलपीजी पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी राज्य शासनाकडून सर्व संबंधित यंत्रणांना सूचित करण्यात आल आहे. तसच या संदर्भात राज्य स्तरावर नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आला असून व्हॉट्सॲप क्रमांक 9769919221 / ९७६९९१९२२१ जारी करण्यात आला आहे, अशी माहिती अन्न नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाचे मंत्री छगन भुजबळ यांनी विधान परिषदेत दिली. रिफायनऱ्यांमधील एलपीजी उत्पादन वाढवण्यात आलं असून शाळा, महाविद्यालये आणि रुग्णालयांना 100 टक्के गॅस पुरवठा करण्याच्या सूचना देण्यात आल्या असल्याची माहिती त्यांनी दिली.

---

लोकसभा/पीक विमा

शेतकऱ्यांसाठीच्या प्रधानमंत्री पीक विमा योजनेत केंद्र सरकारने सुधारणा केली असल्याची माहिती केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी आज लोकसभेत एका प्रश्नाच्या उत्तरात दिली. विम्याचे दावे २१ दिवसात निकाली काढणं बंधनकारक असून त्यात उशीर झाला, तर कंपनीला १२ टक्के दराने व्याज द्यावं लागेल, असं त्यांनी स्पष्ट केलं. शेतकऱ्यांना हमीभाव यंदा वाढवून दिले असून हमीभावाने खरेदी अजूनही सुरु असल्याचं त्यांनी सांगितलं.

---------------------------------------------------

निलंबन मागे

लोकसभेत गदारोळ करणाऱ्या ८ विरोधी खासदारांचं निलंबन मागे घेण्यात आलं. भंडारा गोंदियाचे काँग्रेस खासदार प्रशांत पडोळे यांच्यासह ८ जणांना गैरवर्तन केल्याबद्दल अधिवेशन संपेपर्यंत सभागृहातून निलंबित केलं होतं. हे निलंबन तात्काळ मागे घ्यावं, असा ठराव संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी मांडला आणि तो एकमताने संमत झाला. यासंदर्भात काल सभापती ओम बिरला यांनी बैठक बोलावली होती. त्यावेळी फलक झळकावणार नाही, एआय वापरलेली चित्रं किंवा चित्रफिती सभागृहात दाखवणार नाही, एकंदर सभागृहाची प्रतिष्ठा राखली जाईल, असं वर्तन करण्याचं आश्वासन सर्वपक्षीय नेत्यांनी दिलं असल्याची माहिती सभापतींनी दिली.

---------------------------------------------------

होर्मूझ

होर्मुझ सामुद्रधुनी पार करून नंदादेवी हे भारताचं दुसरं जहाज आज गुजरातमधल्या वाडीनार बंदरात दाखल झालं. या जहाजावरील सुमारे ४६ हजार मेट्रिक टन एलपीजी उतरवण्याचं काम सुरु झालं आहे.

---------------------------------------------------

टपाल खात

टपाल खात्यानं २४ तासात किंवा ४८ तासात पत्र आणि वस्तू पोहोचवण्याची सुविधा सुरू केली आहे. दिल्ली, मुंबई, चेन्नई, कोलकाता, बेंगळुरू आणि हैदराबादमध्ये आजपासून या सेवेला सुरुवात झाली. केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत या सेवेचं उद्घाटन झालं.

---------------------------------------------------

मधाचे गाव

आदिवासी आणि ग्रामीण भागात मधमाशी पालनास चालना देणे, रोजगारनिर्मिती करणे, जैवविविधतेचे संवर्धन करणे आणि पर्यटनाशी संलग्न शाश्वत विकास साधणे यासाठी मधाचे गाव या योजनेची निर्मिती करण्यात आली आहे. या योजनेच्या पहिल्या टप्प्यात सन २०२५-२६ या वर्षासाठी राज्यातील दहा गावांची निवड करण्यात आली आहे. यात विदर्भातील वर्धा जिल्ह्यातील सिंधीविहिर आणि अमरावती जिल्ह्यातील आमझरी या गावांचा समावेश असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे सभापती रवींद्र साठे यांनी नागपुरात रवी भवन इथं आयोजित पत्रकार परिषदेत दिली. मधाचे गाव योजनेंतर्गत लाभार्थ्यांना १ हजार ६५० मधपेट्या, १२८ संरक्षक पोशाख, २५ किट तसेच अन्य आवश्यक साहित्य ९० टक्के शासकीय अनुदान आणि १० टक्के लाभार्थी स्वगुंतवणुकीच्या तत्वावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

-----------------------------------------------

किसान सन्मान निधी

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत डिसेंबर 2025 ते मार्च 2026 या कालावधीतील 22 वा हप्ता यवतमाळ जिल्ह्यातील एकूण 3 लाख 7 हजार 175 नोंदणीकृत लाभार्थ्यांपैकी पात्र 2 लाख 90 हजार 926 लाभार्थ्यांना दिनांक 13 मार्च रोजी वितरित करण्यात आला . यवतमाळ जिल्ह्यात विविध कारणांमुळे किंवा अनवधानाने पोर्टलवर अपात्र ठरवण्यात आलेल्या 56 हजार 357 लाभार्थ्यांपैकी 7 हजार 691 लाभार्थ्यांना पुन्हा पात्र ठरवण्यात आलं आहे. तसेच स्वयंनोंदणीकृत 8 हजार 482 लाभार्थ्यांना राज्य स्तरावरून मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

-----------------------------------------------

पदभरती प्रलंबित

भंडारा जिल्ह्यातील जिल्हा परिषद अंतर्गत 876 शिक्षकांची पदभरती प्रलंबित असून ती तात्काळ सुरु करावी यासाठी जिल्हा परिषदेसमोर जिल्हा परिषद अध्यक्ष, सभापतीसह सदस्य मागील सहा दिवापासून साखळी उपोषणाला बसले आहेत. आज जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसोबत जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला.

-----------------------------------------------

मोर्चा

यवतमाळ इथं अवैध गो-तस्करी, रेती आणि अमली पदार्थ वाहतुकीकडे दुर्लक्ष करून शेतमाल वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई केल्याचा आरोप करीत प्रहार जनशक्ती

पक्षाने उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. जिल्हाध्यक्ष बिपीन चौधरी यांच्या नेतृत्वात काढलेल्या मोर्चात मोठ्या संख्येने शेतकरी कुटुंबीय सहभागी झाले. शेतमाल वाहतूक करणाऱ्या वाहनांना अडवून दहा हजार रुपयांपर्यंत दंड आकारला जात असल्याचा आरोप करत ही कारवाई थांबवण्याची मागणी करण्यात आली. तसेच पिंपळखुटी चेकपोस्टवरील अवैध वाहतुकीवर कारवाई, दिव्यांगांना परवाने देणे आणि भ्रष्टाचाराची चौकशी करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.

-----------------------------------------------

कुलर वापरताना खबरदारी

विदर्भात वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर कुलर वापरताना विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन महावितरणने नागरिकांना केले आहे. कुलरमध्ये तांत्रिक दोष किंवा घराचे योग्य अर्थिंग नसल्यास विजेचा धक्का लागण्याचा धोका वाढतो, ज्यामुळे अलीकडे काही अपघातही घडले आहेत. कुलर वापरण्यापूर्वी अर्थिंगची तपासणी करून घेणे, पाणी भरताना स्विच बंद करणे आणि ओल्या हातांनी उपकरणांना स्पर्श टाळणे आवश्यक असल्याचे महावितरणने सांगितले आहे. विद्युत अपघात झाल्यास 1912 किंवा 19120 या हेल्पलाईन क्रमांकावर त्वरित संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

-----------------------------------------------

हवामान

विदर्भातील गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात आज वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला असून, उद्या देखील गोंदिया आणि गडचिरोली जिल्ह्यासह नागपूर, वर्धा, यवतमाळ, या जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.  चंद्रपूर जिल्ह्यात मात्र मेघ गरजेनेसह पावसाचा इशारा असल्याने तिथे ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. दरम्यान, देशाच्या विविध भागात मेघगर्जना आणि  विजांच्या कडकडाटासह वादळी पाऊस होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.महाराष्ट्रात अनेक ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता असून शेतकऱ्यांनी त्यादृष्टीनं नियोजन करावं असं राज्यशासनाच्या कृषी विभागाने सांगितलं आहे.

-----------------------------------------------